महाराष्ट्रशासन
शासकीयवैद्यकीयमहाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.
जिल्हासामान्यरुग्णालयपरिसर, बीचरोड,लिमयेवाडी, अलिबाग.जि.रायगड – ४०२ २०१
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, ALIBAG -RAIGAD
DISTRICT CIVIL HOSPITAL AREA, ALIBAG BEACH ROAD, LIMYEWADI, ALIBAG DIST.RAIGAD - 402 201
Email- deangmcalibag@gmail.com Phone No.02141-299214 www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/Pathology Reagents /दरपत्रक मागणी/२६४८/२०२४-२५ दिनांक.११. १० . २०२४

दरपत्रक मागणी पत्र.

प्रति,

----------------------

----------------------

----------------------

विषय :Pathology Reagents साठीदरपत्रके मोहोरबंद लिफाफेसादर करणेबाबत,

अलिबाग येथे १०० विद्यार्थी प्रवेशक्षमतेचे शासकीयवैद्यकीयमहाविद्यालयसन २०२१-२२ याशैक्षणिकवर्षा पासुनसुरूकरण्यासशासनाने व राष्ट्रीयआयुर्विज्ञानआयोग, नवीदिल्ली, यांनीमान्यताप्रदानकेलेलीआहे. महाविद्यालयातील विकृतीशास्त्र विभागाकरीता Pathology Reagents ची आवश्यकताआहे.त्याअनुषंगाने त्यासंबधीत बांबीची खरेदी ही खालील नमुन्यात मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्ती नुसार सादर करावेत.

| Sr. No. | Drug/ Reagent name | Specifications | Pack size | Price Per item Including Taxes |
|---|---|---|---|---|
| 1 | Cell pack 20L | **Cell pack compatible with Sysmex XP 300 from Authorized supplier** | **20L** | |
| 2 | Stromatolyser 500mlx3 | **Stromatolyser compatible with Sysmex XP 300 from Authorized supplier** | **500mlx3** | |
| 3 | Cell clean 50ml | **Cell clean compatible with Sysmex XP 300 from Authorized supplier** | **50ml** | |

अटी व शर्ती.

१. दरपत्रक मोहरबंद लिफाफा , दि.२१/१०/२०२४ रोजी साय.०५:०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

२. दरपत्रक मोहोरबंद लिफाफा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग. जि.रायगड ४०२२०१ (जिल्हा रुग्णालय आवार) यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा.त्याचप्रमाणे दरपत्रक मोहरबंद लिफाफयावर दरपत्रक मागणी क्रमांक, तारीख, व विभागाचे नाव (Pathology reagents) असे लिहुन सादर करावे.

३. लिफाफ्यावरपुरवठाधारकाचे पुर्ण नाव, भ्रमणध्वनी क्र. आणि संपूर्ण पत्ता, संकेतांक क्र. (Email address) लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक(२१/१०/२०२४), दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

४. दर पत्रकात नमुद केलेले दर सन २०२४-२५ वित्तीय वर्षासाठी ग्राहय धरले जातील.

५. प्रस्तावित उदिदष्टांकरिता दरपत्रक आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत.

६. सर्वात कमीतकमी दराचे दरपत्रकाचा पुरवठाआदेशाकरिता विचार करण्यात येईल.

७. सदर उदिदष्टांची किंमत, सर्व करांसहीत (including all taxes)एकुण किंमत अशी दर्शविण्यात यावी.

८.दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये. दरपत्रक हे पुर्णपणे छापील असावे. हस्तलिखित दरपत्रके ग्राहय धरले जाणार नाहीत.

९. दरपत्रक मोहोरबंद लिफाफयात सादर करावयाचे दस्ताऐवज ( Documents Required)
१) अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक (दिलेल्या विनिर्दिष्टेनुसार (Specification) व पॅकआकार (Pack Size) नुसार असावेत)
२).जी.एस.टी.क्रमांक पत्र.
३) Valid Authorization Letter

१० . ज्या पात्र दरपत्रक धारकाचे दर हे न्यूनतम असतील व दस्ताऐवज पुर्ण असतील अशा पुरवठादारास पुरवठा आदेश मिळाल्यानंतर दरपत्र धारकास आवश्यकते नुसार विकृतीशास्त्र विभागासाठीचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

११.पुरवठा आदेश मिळाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत पुरवठा न केल्यास पुरवठा आदेश रदद करण्यात येईल, व व्दितीय न्युनतम पात्र पुरवठाधारकाला प्रथम न्युनतम दराने पुरवठा आदेश देण्यात येतील. पुरवठादाराने पुरवठा करण्यासाठी वाहतुक खर्च स्वत: करण्यात यावा.

१२. पुरवठा करण्यात येणारे Reagents चा कालबाहय दिनांक (Expiry date) पुरवठा आदेश दिनांकापासुन एक वर्षापेक्षा अधिक असावेत व त्यांचा दर्जा उत्तम असावा.

१३. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे तसेच कोणतेहीस्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे हे अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखून ठेवले आहेत.

१४. पुरवठा पुर्ण झाल्यानंतर तीन प्रतीत देयकेही अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग जि. रायगड यांचे नावाने देण्यात यावेत.

१५ . देयकाची अदायगी ही शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येईल. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे विलंब शुल्क अदा केले जाणार नाही.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग-रायगड.

**प्रत-शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या सुचना फलका वर दरपत्रक मागविणया संदर्भात दिनांक :११ १० / २०२४ सुचना देण्यात आल्या आहेत.**